# जिल्हाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग पुरवठा शाखा

## जिल्हाधिकारीः श्री विरेंद्र सिंह

दूरध्वनी क्रमांकः ०२३६२-२२८८४४(कार्यालय)

०२३६२-२२९०२९(निवास)

मोबाईल क्रमांकः ९४२३८६००२२

ईमेल- collcol.si-mh@nic.in

## जिल्हा पुरवठा अधिकारी :श्री. तेजस समेळ

दूरध्वनी क्रमांकः ०२३६२-२२८८४६(कार्यालय)

मोबाईल क्रमांकः ९०२९०२८७८७

ईमेल- collsupdyc.si-mh@nic.in

# शिधापत्रिका बाबतची माहिती

1) **जिल्हयातील एकूण तालुके:- 8** 1) सावंतवाडी, 2) कुडाळ, 3) दोडामार्ग 4) वेंगुर्ला, 5) मालवण, 6) कणकवली, 7) देवगड, 8) वैभववाडी

2) **जिल्हयातील कार्डसंख्या**

1) जनगणनेनुसार लोकसंख्या 8,50,825

2) कार्डावरील लोकसंख्या 8,31,245

3) **जिल्हयाची शिधापत्रिका बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.**

| अ. क्रं. | तालुका | केशरी | पिवळी | अंत्योदय | शुभ्र | अन्नपुर्णा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सावंतवाडी | 25292 | 5520 | 3336 | 5034 | 23 | 39205 |
| 2 | वेंगुर्ला | 12801 | 8058 | 3187 | 1596 | 111 | 25753 |
| 3 | कुडाळ | 21479 | 9296 | 5280 | 4909 | 35 | 40999 |
| 4 | मालवण | 17704 | 8945 | 4018 | 2408 | 113 | 33188 |
| 5 | कणकवली | 19915 | 6921 | 4616 | 3617 | 39 | 35108 |
| 6 | देवगड | 18349 | 6078 | 1728 | 1697 | 140 | 27992 |
| 7 | वैभववाडी | 7062 | 3326 | 1711 | 504 | 156 | 12759 |
| 8 | दोडामार्ग | 7945 | 2003 | 860 | 301 | 40 | 11149 |
| **एकूण** | | **130547** | **50147** | **24736** | **20066** | **657** | **226153** |

# तालुकानिहाय माहे नोव्हेंबर 2012 करीता नियतन मंजूर

**शासनाने एपीएल, बीपीएल व अंत्योदय योजने अंतर्गत नोव्हेंबर 2012 महाकरीता नियतन मंजूर केलेले आहे. मंजूर नियतन व तालुक्याची गरज याचा मेळ घालून खालीलप्रमाणे तालुका व गोदाम निहाय धान्याचे वाटप करण्यात आले आहे.**

माहे नोव्हेंबर 2012 (आकडे मे.टनात)

| अ. क्र. | गोदाम केंद्र | एपीएल | | बीपीएल | | अंत्योदय | | अतिरिक्त एपीएल तांदूळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | |
| 1 | सावंतवाडी | 220 | 164 | 170 | 60 | 130 | -- | १० |
| 2 | वेंगुर्ला | 70 | 59 | 180 | 77 | 100 | -- | २० |
| 3 | कुडाळ | 100 | 109 | 190 | 78 | 140 | -- | २९ |
| 4 | मालवण | 72 | 65 | 117 | 47 | 50 | -- | १५ |
| 5 | आचरा | 35 | 35 | 70 | 27 | 30 | -- | १० |
| 6 | कणकवली | 125 | 106 | 190 | 77 | 125 | -- | २८ |
| 7 | देवगड | 79 | 60 | 97 | 37 | 30 | -- | १८ |
| 8 | विजयदुर्ग | 57 | 45 | 67 | 25 | 20 | -- | ०९ |
| 9 | वैभववाडी | 30 | 40 | 77 | 33 | 50 | -- | २० |
| **एकूण** | | **788** | **683** | **1158** | **461** | **675** | **--** | **१५९** |

# तालुकानिहाय माहे डिसेंबर 2012 करीता नियतन मंजूर

**शासनाने एपीएल, बीपीएल व अंत्योदय योजने अंतर्गत डिसेंबर 2012 महाकरीता नियतन मंजूर केलेले आहे. मंजूर नियतन व तालुक्याची गरज याचा मेळ घालून खालीलप्रमाणे तालुका व गोदाम निहाय धान्याचे वाटप करण्यात आले आहे.**

माहे डिसेंबर 2012 (आकडे मे.टनात)

| अ. क्र. | गोदाम केंद्र | एपीएल | | बीपीएल | | अंत्योदय | | एपीएल अतिरिक्त | बीपीएल अतिरिक्त | केंद्रीय अन्नपूर्णा योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | | | |
| 1 | सावंतवाडी | 70 | 140 | 100 | 81 | 130 | 49 | 30 | 60 | -- |
| 2 | वेंगुर्ला | 20 | 30 | 50 | 80 | 60 | 40 | 10 | 50 | 02 |
| 3 | कुडाळ | 50 | 70 | 140 | 90 | 170 | 60 | 20 | 70 | 02 |
| 4 | मालवण | 30 | 40 | 40 | 30 | 30 | 10 | 19 | 30 | 02 |
| 5 | आचरा | 10 | 10 | 10 | 20 | 30 | 10 | 10 | 20 | 01.08 |
| 6 | कणकवली | 59 | 100 | 130 | 80 | 150 | 70 | 50 | 60 | -- |
| 7 | देवगड | 40 | 50 | 40 | 30 | 35 | 20 | 10 | 25 | 02 |
| 8 | विजयदुर्ग | 30 | 40 | 40 | 20 | 20 | 10 | 10 | 20 | 02 |
| 9 | वैभववाडी | 10 | 20 | 50 | 30 | 50 | 20 | -- | 30 | 02 |
| **एकूण** | | **319** | **500** | **600** | **461** | **675** | **289** | **159** | **365** | **13.08** |

# साखर नियतन ( बीपीएल)

| अ. क्रं. | गोदाम केंद्र | माहे सप्टेंबर 2012 | माहे ऑक्टोबर 2012 | माहे नोव्हेंबर 2012 | माहे डिसेंबर 2012 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सावंतवाडी | 195 | 190 | 250 | 180 |
| 2 | कुडाळ | 215 | 210 | 273 | 220 |
| 3 | वेंगुर्ला | 185 | 180 | 235 | 170 |
| 4 | मालवण | 150 | 150 | 210 | 150 |
| 5 | देवगड | 110 | 115 | 150 | 100 |
| 6 | कणकवली | 170 | 175 | 240 | 200 |
| 7 | वैभववाडी | 70 | 75 | 95 | 75 |
| **एकूण** | | **1095** | **1095** | **1453** | **1095** |

# 2012 करीता डिलरनिहाय व तालुकानिहाय_

# केरोसीन मंजुर नियतन 100%

| क्र | केरोसीन डिलरचे नांव | कंपनीचे नांव | मंजूर नियतन | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दोडामार्ग | सावंतवाडी | वेंगुर्ला | कुडाळ | मालवण | कणकवली | देवगड | वैभववाडी | एकूण |
| 1 | मे. एम. ए. स्वार, वेंगुर्ला | बीपीसी | 36 | 36 | 12 | -- | -- | -- | -- | 12 | 96 |
| 2 | पी. जी. शिरोडकर, मालवण | बीपीसी | -- | -- | -- | 12 | 72 | 12 | -- | -- | 96 |
| 3 | मे. डब्ल्यु वाय पोकळे, देवगड | बीपीसी | -- | -- | -- | 12 | -- | -- | 84 | -- | 96 |
| **एकूण** | | | **36** | **36** | **12** | **24** | **72** | **12** | **84** | **12** | **288** |
| 4 | मे. आर. एम. भांगले, सावंतवाडी | एचपीसी | -- | 72 | -- | -- | -- | -- | -- | -- | 72 |
| 5 | मे. व्ही. एस. दळवी, कुडाळ | एचपीसी | -- | -- | -- | 72 | -- | -- | -- | -- | 72 |
| 6 | मे. पी. डी. कामत, कणकवली | एचपीसी | -- | -- | -- | -- | -- | 84 | -- | -- | 84 |
| **एकूण** | | | **--** | **72** | **--** | **72** | **--** | **84** | **--** | **--** | **228** |
| 7 | मे. जी. आर. पाटकर, मालवण | आयओसी | -- | -- | 72 | 12 | 12 | -- | -- | 36 | 132 |
| **एकूण** | | | **--** | **--** | **72** | **12** | **12** | **--** | **--** | **36** | **132** |
| **एकूण** | | | **36** | **108** | **84** | **108** | **84** | **96** | **84** | **48** | **648** |

# पाच जीवनावश्यक वस्तूंचे शासकीय दर व वाटपाचे परिमाण

सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वितरित होणाया तांदुळ, गहू, तूरडाळ, पामतेल व साखर या 5 शिधावस्तूंच्या स्वस्त धान्य दुकानातील किरकोळ विक्री किंमती सन 2012 पर्यत स्थिर ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

| अ.क्र. | वस्तूचे नांव | सार्वजनिक वितरण व्यवस्थेअतंर्गत वितरित करण्यांत येणाया शिधा वस्तूंच्या किंमती ( रुपये प्रति किलो/लिटर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बीपीएल | अंत्योदय | अन्नपूर्णा | एपीएल |
| 1 | गहू | 5.00 | 2.00 | विनामूल्य | 7.20 |
| 2. | तांदुळ | 6.00 | 3.00 | | 9.60 |
| 3. | साखर | 13.50 | 13.50 | 13.50 | 20.00 |
| 4. | तूरडाळ | 55.00 | 55.00 | 55.00 | 55.00 |
| 5. | पामतेल | 45.00 | 45..00 | 45.00 | 45.00 |

| अ.क्र. | वस्तूचे नांव | सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करणेत येणाया शिधावस्तूंच्या वाटपाचे परिमाण ( दरमहा ) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बीपीएल | अंत्योदय | अन्नपूर्णा | एपीएल |
| 1. | गहू | 35 किलो प्रतिकार्ड ( गहू 11 किलो + तांदुळ 24 किलो | 35 किलो प्रतिकार्ड (गहू 10 किलो + तांदुळ 25 किलो | तांदुळ 10 | 15 किलो प्रतिकार्ड (गहू 5 किलो + तांदुळ 10 किलो |
| 2. | तांदुळ | | | | |
| 3. | साखर | 500 ग्रॅम प्रति माणसी | 500 ग्रॅम प्रति माणसी | 500 ग्रॅम प्रति माणसी | 2 किलो प्रतिकार्ड |
| 4. | तूरडाळ | 1 किलो प्रतिकार्ड | 1 किलो प्रतिकार्ड | 1 किलो प्रतिकार्ड | 1 किलो प्रतिकार्ड |
| 5. | पामतेल | 1 लिटर प्रतिकार्ड | 1 लिटर प्रतिकार्ड | 1 लिटर प्रतिकार्ड | 1 लिटर प्रतिकार्ड |

या जिल्हयांत सर्वसाधारणपणे उपरोक्त वस्तूंचे बाजारभाव खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | तांदुळ | रुपये 15/ ते रुपये 45/ प्रति किलो |
| 2. | गहू | रुपये 22/ ते रुपये 26/ प्रति किलो |
| 3. | साखर | रुपये 30/ ते रुपये 32/ प्रति किलो |
| 4. | तूरडाळ | रुपये 60/ ते रुपये 70/ प्रति किलो |
| 5. | पामतेल | रुपये 60/ ते रुपये 80/ प्रति किलो |

## जिल्हयातील धान्य साठवणुकीची गोदाम क्षमता दर्शविणारे पत्रक

| अ.क्र. | तालुका | गोदामाचे नांव | गोदाम संख्या | क्षमता मे.टन |
|---|---|---|---|---|
| 1 | सावंतवाडी | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 500 |
| 2 | वेंगुर्ला | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 300 |
| 3 | | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 500 |
| 4 | | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 600 |
| 5 | कुडाळ | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 400 |
| 6 | | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 500 |
| 7 | कणकवली | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 500 |
| 8 | | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 250 |
| 9 | देवगड | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 300 |
| 10 | | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 600 |
| 11 | गोदाम विजयदुर्ग | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 600 |
| 12 | मालवण | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 500 |
| 13 | गोदाम आचरा | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 500 |
| 14 | वैभववाडी | शा.गो. इ.क्र.1 | 1 | 500 |
| **एकूण** | | | | **6550** |

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एकूण 9 शासकीय गोदाम केंद्गे असून त्यांची क्षमता 6550 मे. टन इतकी आहे. शासनाच्या मंजूर नियतनानुसार जिल्हयासाठी तांदुळ 3358 टन व गहू 1564 टन एकूण 4922 टन इतकी मासिक गरज आहे. सदर गोदामांमध्ये किमान 3 महिन्यांचा धान्य साठा

करावयाचा असल्याने कार्यरत असलेल्या गोदामांमध्ये दुरुस्त्या व नवीन बांधकामांचे प्रस्ताव शासनाकडे सादर करुन त्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयात सध्या रत्नागिरी येथील एफसीआय व एमएसडब्लूसी या गोदामातून धान्याचा पुरवठा करण्यात येतो. तथापी रत्नागिरीतील उक्त गोदामे व सिंधुदुर्ग जिल्हयातील गोदाम केंद्गे यामधील अंतर सुमारे 200 कि.मी. आहे. तसेच सदर धान्य वाहतूकीचा रस्ता हा डोंगराळ भागातून येत असल्याने गाडया येतांना त्यांच्या मार्गात अनेक अडचणी येतात. व पावसाळयात त्याचे प्रमाण जास्त असते.

मात्र शासन स्तरावरुन कुडाळ एमएसडब्लूसी गोदामातून सिंधुदुर्ग जिल्हयासाठी धान्याचा साठा पुरविण्यात येत असल्याचे समजते त्यानुसार एमएसडब्लूसी यांची सुमारे 7000 टन क्षमतेची गोदामे तयार करण्यात आलेले आहे.

सन 2012 महात तालुकावार मंजूर करण्यात आलेल्या स्वस्त धान्य दुकान / किरकोळ केरोसीन परवाने

## स्वस्त धान्य दुकान परवाने

| अ. क्र. | तालुका | मंजूर परवाने, गावांची नावे |
|---|---|---|
| 1 | देवगड | 1) महाळूंगे 2) पेंढरी 3) धालवली 4) कटटा 5) लिगडाळ 6)किंजवडे 7) सांडवे 8) नांद 9) विरवाडी |
| 2 | कुडाळ | 1) वर्दे, 2) घोडगे-भरणी, 3) रानबांबुळी |
| 3 | कणकवली | 1) आशिये |
| 4 | सावंतवाडी | 1) आंबोली 2) असनिये 3) निगुडे |
| 5 | दोडामार्ग | 1) मळेखोली 2) भेडशी-2 3) तेरवणमेढे 4) दोडामार्ग-2 5)आयनोडे-पालपुनवर्सन |
| 6 | वेंगुर्ले | 1) तुळस-1 |
| 7 | वैभववाडी | 1) नापणे |

## किरकोळ केरोसीन परवाने

| अ. क्रं. | तालुका | मंजूर परवाने, गावांची नावे |
|---|---|---|
| 1 | दोडामार्ग | 1) विर्डी |
| 2 | वैभववाडी | 1) कुसूर |
| 3 | मालवण | 1) असगणी |
| 4 | कुडाळ | 1) सोनवडे तर्फे हवेली |

# घरपोच धान्य योजना

सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत धान्याचा काळा बाजार रोखण्याच्या दृष्टीने नासिक जिल्हयाच्या धर्तीवर घरपोच धान्य योजना या जिल्हयांत सुरु करणेत आलेली आहे. दिनांक 31 एप्रिल 2011 अखेर खालील तालुक्यांत धान्य वाटप करणेत आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | सावंतवाडी | 1.तेरवणमेढे, 2.खोकरल, 3.उसप, 4.धाकोरे, 5.दांडेली, 6.आरोस, 7.कुणकेरी, 8.आंबेगांव,9.नेमळे,10.कलंबिस्त, 11.साटेली,12.भेडशी-1 व 2 13.सातार्डा, 14.ओटवणे,15.शिरशिंगे,16.बांदा, 17.घोडगेवाडी. 19.सांगेली,20.वेर्ले |
| 2. | वेंगुर्ला | 1, वेंगुर्ला दुकान नं.1,3,4 2.आडेली,3.आसोली,4.शिरोडा-1 व 2, 5.रेडी-1 व 2, 6.मठ,7.आरवली,8.पालकरवाडी |
| 3. | कुडाळ | 1. जांभरमळा, 2 साळगांव, 3.कालेली, 4.घाटकरनगर, 5.नानेली, 6.कारीवणे, 7.टेंबगोव, 8.हूमरमळा,(अणाव) 9.अणाव, 10.आवळेगांव, 11.आवळेगांव, 12.वाडीवरवडे, 13.किनळोस, 14.ओरोसखुर्द, 15.बांव 16.कुसगांव |
| 4. | मालवण | 1.वडाचा पाट, 2.असरोंडी, 3.मठ बुद्रुक, 4.असगणी, 5.गोठणे, 6.शिरवंडे, 7.श्रावण, 8.आडवली |
| 5. | कणकवली | 1.असलदे, 2.नांदगांव, 3 वारगांव, 4.शिडवणे, 5.लिंगेश्वरनगर 6.जानवली, 7.कलमठ नं.2 , 8.वाघेरी, 9.साळीस्ते, 10.राजवाडी 11.शिडवणे 12.कासरल, 13.कासार्डे नं.1, 14. पिसेकामते, 15. करंजे, 16. तोंडवली, 17 हुबरट, 18.जांभळगांव,19.लोरे,20.ओटव 20. नरडवे. |
| 6. | देवगड | 1.हडपीड, 2.वळिवंडे, 3.शेवरे, 4.शेवरे 5. ओंबळ 6 कुवळे 7.सांडवे, 8.लिंगडाळ,9.बापार्डे, 10.पडवणे, 11.खुडी, 12.कुणकेश्वर, 13.मोंड, 14.चिंचवड, 15.सौदाळे, 16.वाघोटन, 17.फणसगांव, 18.इळये, 19. दहिबांव, |
| 7 | वैभववाडी | 1.आचिर्णे,2.खांबाळे,3.सांगुळवाडी,4.सडूरे,5.नाधवडे,6.बेळेकरवाडी |

,7.कोकीसरे,8.करुळ,9.बाजारवाडी,10.कुंभवडे ,11.एडगांव,12.सोनाळी,
13.वैभववाडी,14.नावळे,15.बांधवाडी,16.कोळपे,17.हेत,18.आखवणे,
,19.मांगवली,20.तिथवली,21.उपळे, 22.नेर्ले,23.जांळावडे,24.भुईबावडा
25.वेंगसर,26.नानीवडे.

8 दोडामार्ग 1. पिकुळी,

वरील गांवाना प्रायोगिक तत्वावर प्रत्यक्ष धान्यसाठा वाटप करणेत आलेला आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील तालुका निहाय पेट्रोल/डिझेल पंपाची माहिती.

| अ. क्र. | तालुका | पेट्रोल/ डिझेल पंपाचे नांव | पेट्रोल/ डिझेल मालकाचे नांव व पत्ता | कंपनी | क्षमता | | क्षमता | | दैनिक सरासरी व्रिक्री | | दैनिक सरासरी व्रिक्री | | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पेट्रोल | स्पीड पेट्रोल | डिझेल | हायस्पीड डिझेल | पेट्रोल | स्पीड पेट्रोल | डिझेल | हाय स्पीड डिझेल | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | वेंगुर्ले | प्रियल | सौ. पुष्पा प्रदीप नांदगावकर, रा. जानवली. कणकवली | हिंदूस्थान पेट्रो. कार्पो. लि. | 15000 | 10000 | 15000 | | 2200 | 300 | 2000 | | 262337 |
| | वेंगुर्ले उभादांडा | मानशिश्वर | श्री. अंकुश गावडे | भारत पेट्रोलीएम कं. | 10000 | | 10000 | | 1800 | | 1000 | | 262457 |
| | मठ | लक्ष्मी नारायण | अविनाश पुरुषोत्तम देसाई कुडाळ | भारत पेट्रोलीएम कं. | 10000 | | 10000 | | 1800 | | 1000 | | 9421016970 |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | मालवण | श्री निवास ऑटो सेंटर मालवण | श्रीम निलम नारायण राणे | भारत पेट्रो कंपनी मिरज | 15000 | 15000 | 20000 | | 2500 | 2500 | 2500 | | 02365/ 252551, 94226 26269 |
| | | रामेश्वर कृपा पेट्रो. आचरा | श्रीम. ज्योती शशिकांत गोलतकर | इंडीयन ऑईल कार्पोरेशन लिमिटेड | 20000 | | 20000 | | 2500 | | 4400 | | 02365/ 246435 |
| | | लक्ष्मी नारायण पेट्रोल पंप वराड सावरवाड | श्रीम. रेखा संजय देसाई | भारत पेट्रो. कार्पो. लि. | 10000 | | 15000 | | 1700 | | 2300 | | 02365/ 225555 9423881605 |
| | | भगवती पेट्राल पंप चौके | श्रीम. हरुषा संतोष चव्हाण. चौके | हिंदूस्थान पेट्रो. कार्पो. लि. | 9000 | | 22000 | | 500 | | 1700 | | 9422 373490 |
| 3 | देवगड | देवगड तालुका खरेदी विक्री संघ जामसंडे | चेअरमन देवगड तालुका खरेदी विक्री संघ. जामसंडे | इंडियन ऑईल | 15000 | | 20000 | | 2500 | | 2500 | | 02364/ 262384 |
| | | घाटे ऑटो प्युअल स्टेशन जामसंडे | श्री. राजेश नंदकुमार घाटे रा. जामसंडे | हिंदुस्थान पेट्रोलियम | 9000 | 9000 | 22000 | | 1000 | | 1200 | | 94211 45341 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मे. साहिल पेट्रो लियम, पडेल | श्री. राजन हरिश्चंद्ग कोचरेकर रा.पडेल | भारत पेट्रोलियम | 15000 | | 20000 | | 500 | | 1000 | | 9423801109 |
| 4 | कणकवली | एस.बी. अँड व्ही. बी सामंत पेट्रोलपंप, कणकवली | श्री कांता रामचंद्ग राणे | | 20 | 15 | 20 | 15 | 4 | 300 | 5000 | 800 | 231567 232028 9421147686 |
| | | सिध्दी एजन्सी जानवली | श्री. नारायण तातू राणे | | 15 | | 20 | | 2 | | 2 | | 232258 9860220931 |
| | | नाईक पेट्रोलीयम वागदे | श्रीम. सुषमा विजय नाईक | | 16 | 9 | 22 | 9 | 2500 | | 6000 | | 230054 9421952113 |
| | | डब्ल्यु वायपोकळे पेट्रोल पंप, कसार्डे | श्री. प्रभाकर वामन पोकळे | | 15 | 20 | 40 | 20 | 3 | 100 | 8 | 200 | 240234 9421239069 9422436929 |
| | | सिंधुदुर्ग ऑटोमोबाईल तरळे | श्री. शरद हरिश्चंद्ग कोचरेकर | | 15 | | 20 | | 1 | | 5 | | 240334 9423801109 |
| | | पोकळे पेट्रोलीयम फोंडाघाट | श्रीम. संतोषी किरण पोकळे | | 10 | | 20 | | 1 | | 4 | | 240016 9422381349 |
| 5 | सावंतवाडी | मोबाईल गॅस सेंटर | श्री. रमेश ना. भाट गांधी चौक सावंतवाडी | इंडियन ऑईल कार्पो. लि. | 15000 | 0 | 15000 | 0 | 3500 | 0 | 3000 | 0 | 02363/275435 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बी. जी. भंगले | श्री. राजन ए. भांगले सालईवाडा सावंतवाडी | हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ. लि. | 16000 | 16000 | 16000 | 0 | 4500 | 300 | 7500 | 0 | 02363/ 272006 |
| 6 | वैभववाडी | वैभवलक्ष्मी ॲटो फ्युएल | कॅप्टन श्री. जगन्नाथ कुंढलीक रावराणे, वैभववाडी | हिंदुस्थान पेट्रोलियम कॉ. लि. | 9000 | | 16000 | | 900 | | 2000 | | 02367 237262 |
| 7 | कुडाळ | लक्ष्मी नारायण पेट्रोल पं.प | अविनाश पुरुषोत्तम देसाई कुडाळ | इंडियन ऑईल | 15000 | 20000 | 18000 | 15000 | 4500 | 450 | 8000 | 600 | 222641 |
| | | चंद्ग दर्शन प्रो.प्रा.लि. | निलम नारायण राणे. कणकवली | भारत पेट्रोलियम | 25000 | | 15000 | | 5000 | | 3500 | | 222581 |
| | | साई सिध्दी ॲटोमोबाईल | चंद्ग शेखर सावंत ओरोस | | 20000 | | 20000 | | 1000 | | 4000 | | 228812 |
| | | सिध्दी एजन्सी | रुपाली हरिश्चंद्ग रावराणे, ओरोस | इंडीयन ऑईल | 15000 | | 20000 | | 1200 | | 2000 | | 228966 |
| | | सेंट्रल ॲटो फ्युअल स्टेशन | गिरीधर रघुनाथ नाईक, पिंगुळी | इंडीयन ऑईल | 22000 | | 22000 | | 500 | | 1000 | | 222621 |

**जिल्हयात पुरवठा यंत्रणेमार्फत केंद्र / राज्य शासन पुरस्कृत खालील योजना राबविण्यात येतात.**

1. अेपीएल योजना
2. बीपीएल योजना
3. अंत्योदय, विस्तारीत अंत्योदय व द्‌वितीय विस्तारीत व तृतीय विस्तारीत अंत्योदय अन्न योजना
4. केंद्रीय अन्नपुर्णा योजना
5. विशेष घटक योजना
6. संपुर्ण ग्रामीण रोजगार योजना
7. एकात्मिक बाल विकास सेवा योजना ( अंगणवाडी)
8. आश्रमशाळा, नारी निकेतन/वसतिगृहे इत्यादी कल्याणकारी संस्थाना बीपीएलचे दराने धान्य पुरवठा
9. शालेय पोषण आहार
10. साखर
11. केरोसीन वितरण

**अेपीएल योजना**

वार्षिक उत्पन्न 15001 ते 1,00,000 पर्यत असलेल्या लाभार्थींना केशरी शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत. सदरच्या योजनेखाली 137605 इतकी लाभार्थी संख्या आहे. अशा कार्डधारकांना दरमहा तांदुळ अधिक गहू एकूण 35 किलो धान्य वितरीत करणेत येते. एपीएल धान्याचे दर तांदुळ 9.60 किलो व गहू 7.20 याप्रमाणे किरकोळ विक्रीचा दर आहे.

**बीपीएल योजना**

वार्षिक उत्पन्न 15000/रुपये पर्यत असलेल्या लाभार्थींना पिवळी शिधापत्रिका वितरीत करण्यात आल्या आहेत. सदरच्या योजनेखाली 53948 एवढे लाभार्थी (कार्डधारक) आहेत. अशा कार्डधारकांना दरमहा तांदुळ अधिक गहू याप्रमाणे एकूण 35 किलो धान्य वितरीत करणेत येते. बीपीएल धान्याचे दर तांदुळ 6/ किलो व गहू 5/ याप्रमाणे किरकोळ विक्रीचा दर आहे.

## अंत्योदय, विस्तारीत अंत्योदय व द्वितीय विस्तारीत व तृतीय विस्तारीत अंत्योदय अन्न योजना

अंत्योदय अन्न योजने अंतर्गत गावातील बीपीएल कुटूंबाचे संख्येस 0.219422 ने गुणून येणाऱ्या संख्येइतक लाभार्थी प्रत्येक गावामध्ये निवडण्यात आलले असून या योजने अंतर्गत लाभार्थ्यांची संख्या 27551 इतकी आहे.

तसेच शासनाच्या 8 मे 2001 च्या शासन निर्णयानुसार ज्या कुटूंबाचे प्रमुख विधवा स्त्री अथवा आजारी अथवा अपंग किंवा 60 वर्षे वयावरील असलेले वृध्द आहेत. अशा व्यक्ती व आदिवासी मिळून 5458 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

तसेच 13 ऑगस्ट 2004 च्या शासन पत्रानुसार वरील प्रमाणे परंतू भुमिहिन शेतमजूर अल्प भूधारक, ग्रामीण कारागीर यांचा समावेश करून आणखी 2622 लाभार्थ्यांना मिळून एकूण 27551 लाभार्थी अंत्येदय योजनेचा लाभ घेत आहेत. अशा कार्डधारकांना दरमहा तांदुळ अधिक गहू याप्रमाणे एकूण 35 किलो धान्य वितरीत करण्यात येते. अंत्योदय धान्याचा तांदुळ रु. 3/ व गहू रु. 2/ याप्रमाणे किरकोळ विक्रीचा दर आहे.

### केंद्रीय अन्नपुर्णा योजना

शासन 20 जून 2000 च्या शासन निर्णयानुसार जे निराधार असलेल्या व ज्यांना उत्पन्नाचे निश्चित साधन नाही. अशा 1280 लाभार्थ्यांना ( 65 वर्षावरील स्त्री, पुरुष) अन्नपुर्णा योजने अंतर्गत लाभ दिला जातो. पात्र लाभार्थीस दरमहा 10 किला तांदूळ मोफत दिला जातो.

### विशेष घटक योजना

महसुल व वन विभाग यांचे दिनांक 5.8.2002 च्या शासन निर्णयानुसार टंचाई सदृश्य परिस्थिती घोषीत केलेल्या जिल्हयातील अतिरिक्त रोजगार निर्मितीच्या कामावर म्हणजेच राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेच्या कामावर हे धान्य वाटप केले जाते. ही कामे संपुर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत विशेष घटक योजनेशी जोड देवून मंजूरीचा भाग म्हणून धान्य वाटप केले जाते. या योजने अंतर्गत मजूरांना मजूरीचा भाग म्हणून प्रतिमनुष्य प्रतिदिन 5 किलो याप्रमाणे गहू करीता प्रति किलो रु. 5/ व तांदुळाकरीता 6/ रुपये प्रमाणे मजूरीतून रक्कम वळती करून आवश्यक ती धान्य कुपने दिले जाते. व त्यानुसार धान्य दुकानामार्फत मजूरांना धान्य वाटप केले जाते.

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना (अंगणवाडी)

एकात्मिक बालविकास योजने अंतर्गत खालिल लाभार्थ्यांना पूरक पोषण आहार वाटप केला जातो.

1) 0 ते 6 वर्षे वयोगटातील बालके 2) गरोदर व स्तनदा माता.

जिल्हयातील अंगणवाडी केंद्रांची संख्या 904

| | | | |
|---|---|---|---|
| लाभार्थी संख्या | 0 ते 6 वर्षे वयोगटातील बालके | | 60077 |
| (माहे मे 2009 अखेर) | गरोदर व स्तनदा माता | | 8785 |
| | | एकूण | 68862 |

आश्रमशाळा , नारीनिकेतन/वसतिगृहे इत्यादी कल्याणकारी संस्थाना बीपीएलचे दराने धान्य पुरवठा

शासन निर्णय क्रमांक साविव्य. 1002/1137/प्र.क्र. 973 दि. 26.4.2002 अन्वये जिल्हयातील आश्रमशाळा/वसतीगृहे/नारीनिकेतन इत्यादींना दरमहा प्रति माणसी 15 किलो धान्य देण्यात येते. जिल्हयामध्ये एकूण 937 लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो.

शालेय पोषण आहार (तांदूळ वाटप) योजना

शालेय पोषण आहार योजने अंतर्गत शासनाने माहे जून 2002 पासून रास्त भाव धान्य दुकाना मार्फत आस्थापना शिधापत्रिकेवर संबंधीत शाळांना तांदूळ वितरण करण्याची नवीन कार्यपध्दती सुरु केलेली आहे. मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय पोषण शिक्षण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक शापोआ 2009/प्र. क्रं. 136/प्रशि 4, दिनांक 18 जून 2009 अन्वये शालेय पोषण आहार योजने अंतर्गत इयत्ता 1 ली ते 5 वी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थांना 450 उष्मांक आणि 12 ग्रॅम प्रथिने युक्त दुपारचे भोजन तसेच इयत्ता 6 वी ते 8 वी च्या विद्यार्थांना 700 उष्मांक आणि 20 ग्रॅम प्रथिने युक्त दुपारचे भोजन देण्यात येत आहे.

# आधारभूत किंमत धान खरेदी योजना

सन 2010-2011 या खरीप पणन हंगामात किमान आधारभूत योजनेअंतर्गत या जिल्हयात धान खरेदीची कार्यवाही जिल्हा मार्केटींग अधिकारी सिंधुदुर्ग मुख्य खरेदी अभिकर्ता यांचे मार्फत आलेली आहे. चालू वर्षात खरेदी अभिकर्ता यांचेकडून दिांक 31/08/2010 अखेर सर्वसाधारण प्रतीचे प्रति क्विंटल रक्कम रु. 570/ या दराने 19923.63 क्विंटल भात धान्याची खरेदी करणेत आलेली आहे.

सदर निविदापैकी भात भरडाई समितीने 1) आजरा तालुका किसान सहकारी भात खरेदी विक्री संघ लि. आजरा, 2) पुष्कर मॉडर्न राईस मिल हरकुळ बुद्‌गुक, ता‍ कणकवली 3) मे. दत्त राईस मिल कोल्हापूर यांचेमार्फत धान्य भरडाईची कार्यवाही करणेत आलेली आहे.

## किरकोळ केरोसीन परवान्यासाठी अर्ज करण्याचे निकष

ज्या गावांसाठी किरकोळ केरोसीन परवाना मंजूर करावयाचा असेल अशा गांवांकरिता जिल्हा पुरवठा अधिकार त्या त्या गावासाठी जाहिरनामे प्रसिध्द करु शकतात.

.

1) जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून 10 दिवसांच्या आत इच्छूक व्यक्तीं यांनी तहसिलदार यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज सादर करावयाचा आहे.

2) ज्या व्यक्तींकडे किंवा त्यांच्या कुटुंबाकडे तसेच सहकारी संस्थेकडे यापुर्वी रॉकेल परवाना असल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

3) अर्जदार संस्था नोंदणीकृत असल्यास संस्थेच्या आर्थिक परिस्थितीबाबत व कार्यक्षमतेबाबत सहाय्यक निंबंधक यांचे अभिप्राय जोडणे आवश्यक आहे.

4) अर्जदार संस्था नोंदणीकृत असल्यास तिच्या कायदेशीर अस्तित्वा बाबत पुरावा जोडणे आवश्यक आहे.

5) व्यक्तीगत अर्जदाराने आर्थिक क्षमतेबाबत ( पोस्टाचे/बँकेच्या पासबुकाची झेरॉक्सप्रत ) पुरावा जोडणे आवश्यक आहे.

6) अर्जदाराकडे कार्डधारकांना सोयीस्कर वाहतूक सुलभ होईल अशी वाणिज्य अकृषीक असलेली जागा किरकोळ केरोसीना व्यवसायासाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. (व्यवसायाची जागा अकृषीक असल्याबाबतचा पुरावा जोडणे आवश्यक व घरपत्रकाचा उतारा.)

7) अर्जदार व्यक्ती अय व्यक्तीच्या जागेत व्यवसाय चालविणार असल्यास त्या इसमाचे रु.100/ च्या स्टँम्पपेपरवर कबुलीपत्र (संमत्तीपत्र) व ग्रामपंचायतीकडील घरपत्रकाचा उतारा जोडणे आवश्यक आहे.

8) अर्जासोबत जागेचा 7/12 उतारा व जागेचा नकाशा जोडणे आवश्यक आहे.

9) अर्जदार सुशिक्षित बेकार असल्यास सेवा योजा/समाज कल्याण कार्यालयाचे ओळखपत्र जोडणे आवश्यक आहे.

10) ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला.

11) पोलीस अधीक्षक यांचेकडील वर्तणूकीचा दाखला.

12) कोणताही अर्ज मंजूर अथवा नामंजूर करणे ही बाब खालील सही करणार यांचे अखत्यारितील राहील.

किरकोळ केरोसीन अनामत रक्कम 3000/ परवाना फी 500/

नुतनिकरण फी रु. 250/

. ५/- प्रमाणे

शासान निर्णय क्र. रॉकेल1003/प्र.क्र.3249/ना-पु27 दिनांक 20 फेब्रुवारी 2004 मध्ये नमूद केल्याप्रमाणे अग्रक्रम सूचीप्रमाणे किरकोळ केरोसीन परवाने मंजूर केले जातात.

1) अधिकृत शिधावाटप/रास्त भाव धाय दुकानदार (या संवर्गाचा केरोसीन परवाना मंजूरीसाठी विचार करताना कार्यरत परवाना धारकांविरुध्द गेल्या वर्षाच्या कालावधीत अकार्यक्षम व्यवसाय, धायाचा गैरव्यवहार याकरिता अनामत रक्कम जप्त, विलंबा, परवाना रद्द करणे, दंडात्मक कारवाई यासारखी शिक्षा झालेली असू नये.)
2) सुशिक्षित बेरोजगार
3) अपंग व्यक्ती
4) माजी सैनिक, रणांगणात धारातीर्थी पडलेल्या अथवा माजी सैनिकांची विधवा पती, त्यांचा सज्ञान मुलगा अथवा सज्ञान अविवाहित मुलगी.
5) प्रकल्पग्रस्त व्यक्ती.
6) अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील व्यक्ती.
7) मागासवर्गीय ग्राहक सहकारी संस्था
8) स्त्रियांची ग्राहक सहकारी संस्था
9) इतर ग्राहक सहकारी संस्था
10) ग्राम पातळीवरील विविध सेवा सहकारी संस्था
11) इतर
12) किरकोळ केरोसीन परवाना अर्जदार व्यक्ती/संस्थेस मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे अटी शर्ती

असल्या तरी शासा प्रचलित आदेशानानुसार त्यामध्ये बदल करणेत येतो.

किरकोळ/हॉकर्स केरोसीन परवानाधारकांच्या मृत्युनंतर परवानाधारकांच्या वारसाच्या नावे परवाना वर्ग करण्याबाबत खालील मार्गदर्शक सूचाना विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येते.

1) केरोसीन परवानाधारकचा मृत्यू झाल्यास, सदरहू परवाना त्याच्या वारसाच्या नावे वर्ग करताना, कुटूंबाच्या व्याख्येत समाविष्ट केल्याप्रमाणे वारसांमध्ये परवानाधारकाची पती अथवा पती, सज्ञान मुलगा, सज्ञान अविवाहीत मुलगी, परवानाधारकावर अवलंबून असणारे आईवडील,सून,कायदेशीर वारसदार, दत्तक पुत्र व परवानाधारकावर अवलंबून असणारी घटस्फोटीत मुलगी यांचा समावेश करण्यात येतो.
2) किरकोळ केरोसीन परवापानाधारकाचा मृत्यु झाल्यास, परवानाधारकाच्या मृत्युपासून 90 दिवसाच्य आत, परवानाधारकाच्या वारसाठी अर्ज केल्यास व तो परवायाबाबतच्या अटी/शर्ती पूर्ण करीत असल्यास, सदर परवाना अशा वारसाच्या नावावर, दिनांक 21/7/2000 व दिनांक 24/11/2000 रोजीच्या शासान परिपत्रकातील तरतुदीनुसार वारसाच्या नावे वर्ग करण्यात येतो.
3) ज्या ठिकाणी एकापेक्षा जास्त वारस असतील, त्या ठिकाणी ज्या वारसाच्या नावे परवाना वर्ग करावयाचा आहे, त्या वारसाने इतर वारसांचे रक्कम रुपये 100/ च्या बॉण्ड पेपरवर नाहरकत प्रमाणपत्र अनुज्ञाप्ती प्राधिकायां समक्ष सादर करणे आवश्यक आहे, जेणेकरुन इतर वारसांमध्ये वाद निर्माण होऊन परवाना वर्ग करण्याच्या कार्यवाहीमध्ये बाधा येणार नाही.
4) अशा प्रकारे परवाने वारसाच्या नावे वर्ग करतांना, याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनीच स्वतःच्या मंजुरीने करावी. या संदर्भात त्यांनी इतर अधिका-यांना प्राधिकृत करु नये.
5) हॉकर्स परवानाधारक मृत्यू पावल्यास, त्याच्या वारसास हॉकर्स परवाना न देता, पूर्वीप्रमाणे किरकोळ केरोसीन परवाना देण्यात येईल. वारसदार स्वतः व्यवसाय करीत असेल तर असा परवाना तात्काळ रद्द करण्यात येईल.
6) मृत केरोसीन परवानाधारकाच्या वारसाने केरोसीन विक्रीचा व्यवसाय स्वतः करणे बंधाकारक आहे.
7) उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत किरकोळ अथवा हॉकर्स परवाना धारकांच्या वारसाने परवाना त्यांच्या नावे वर्ग करण्यासंदर्भात अर्ज सादर केला नसल्यास व विहित अटी व शर्तीनुसार वारस पात्र आढळून न आल्यास अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार जाहिरातीव्दारे अर्ज मागवून किरकोळ केरासीन परवाने मंजुर करण्यात येतील.

किरकोळ केरोसीन परवाने वारसाच्या नावे वर्ग करण्याबाबत.
( शासा निर्णय क्र. रॉकेल1003/प्र.क्र.3249/ना.पु. 27/ दिनांक 25 मे 2004)

किरकोळ/ हॉकर्स केरोसीना परवानाधारकाच्या हयातीत, परवाना वारसाच्या नावे वर्ग करण्याबाबत खालील अटीपैकी कोणत्याही एका अटीची पर्तता झाल्यास संबधित परवानाधारकाच्या लेखी विनंतीवरुन तो परवाना त्याने प्रस्तावित केलेल्या वारसाच्या नावे वर्ग करता येईल. असा शासानाने निर्णय घेतलेला आहे.

1) जो केरोसीन परवानाधारक वृध्दापकाळामुळे (त्यांच्या वयाच्या 65 वर्षानंतर) व्यवसायातुन निवृत्ती स्विकारु इच्छितो(वयाबाबत नियमानुसार पुरावा सादर करणे आवश्यक)
2) जो केरोसीन परवानाधारक दीर्घकालीन आजारपणामुळे किंवा वैद्यकीय कारणास्तव व्यवसाय करण्यास कायमस्वरुपी असमर्थ ठरत असेल ( जिल्हा शल्य चिकित्सकाचे वैद्यकिय प्रमाणपत्र आवश्यक)
3) ज्या परवानाधारकास 60 टक्केपेक्षा जास्त अपंगत्व आलेले आहे व त्या अपंगत्वामुळे तो स्वतः व्यवसाय करण्यस सक्षम ठरु शकत नाही. ( जिल्हा शल्य चिकित्सकाचे वैद्यकिय प्रमाणपत्र आवश्यक)

अशा परवानाधारकाने स्वच्छेने त्यांच्या वारसापैकी एकाच्या नवे किरकोळ/हॉकर्स परवाना वर्ग करण्याबाबत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह अनुज्ञप्ती प्राधिकायाकडे लेखी विनंती अर्ज केल्यानंतरच अनुज्ञप्ती प्राधिकारी परवाना वारसाच्या नावे वर्ग करण्याबाबतची कार्यवाही करतील.

वरील प्रमाणे परवाना वारसाच्या नावे वर्ग करताना त्या संबधातील कार्यवाही जिल्हाधिकारी अथवा जिल्हा पुरवठा अधिकारी हे स्वतःच्या मंजूरीने करतील. हॉकर्स परवानाधारकाच्याबाबत परवाना वर्ग करताना वारसदारास हॉकर्स परवाना देता किरकोळ केरोसीन परवाना देण्यात येईल.

किरकोळ केरोसीन परवाने वारसास मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे अटी शर्ती असल्या तरी शासा प्रचलित आदेशानुसार त्यामध्ये बदल करणेत येतो.

## रास्त भाव धान्य दुकान व्यवस्थापन मंजूरीकामी अधिकार /निकषाबाबतची माहिती.

शासा निर्णय दि. 20 जून 2006 अवये रास्त भाव धान्य दुकान प्राधिकार मंजूरीचे अधिकार जिल्हा पुरवठा अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. रास्त भाव धान्य दुकान मंजूरीचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

1) रास्त भाव धाय दुकानसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जाहिरानामा प्रसिध्द केलेल्या तारखेपासून 15 दिवसांचे आत संबंधित तहसिलदार यांजकडे अर्ज सादर करावेत.मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जात नाही.

2) ज्या व्यक्तीकडे किंवा त्याच्या कुटुंबाकडे तसेच सहकारी संस्थेकडे यापुर्वी एक किंवा अधिक धान्य दुकाने असल्यास अशा अर्जदार व्यक्तीचा/संस्थेचा विचार केला जात नाही.

3)अर्जदार संस्था नोंदणीकृत असल्यास संस्थेच्या आर्थिक परिस्थितीबाबत तसेच कार्यक्षमतेबाबत सहाय्यक निबंधक यांचे अभिप्राय जोडणे आवश्यक.

4) अर्जदार संस्था नोंदणीकृत नसल्यास तिच्या कायदेशीर अस्तित्वाबाबत पुरावा जोडणे आवश्यक.

5) व्यक्तीगत अर्जदाराने वर्तणुकीबाबत पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांजकडील दाखला जोडणे आवश्यक.

6) व्यक्तीगत अर्जदाराने आर्थिक क्षमतेबाबत पोस्टाच्या/बँकेच्या पासबुकाची अद्यावत झेरॅक्स प्रत जोडणे आवश्यक.

7) अर्जदार व्यक्तीने रहिवासी दाखला जोडणे आवश्यक.

8) अर्जदार व्यक्तीने शैक्षणिक पात्रतेबाबत शाळा सोडल्याचा दाखला जोडणे आवश्यक.( अर्जदार व्यक्ती किमान शालांत/एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक) तसेच सुशिक्षित बेकार असल्यास समाज कल्याण विभागाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

9) अर्जदार व्यक्तीने (ग्रामीण विभाग असल्यास ) धाय दुकान मंजूरीसाठी ग्रामसभेचा ठराव जोडणे आवश्यक. (धान्य दुकान अर्जदार व्यक्तीस देणेस दिलेला नाहरकत दाखला.)

10) अर्जदार व्यक्ती/संस्था धाय दुकान ज्या जागेत चालविणार ती जागा अकृषिक असलेबाबत बिनशेती आदेशाची प्रत तसेच या जागेत दुकान चालविणार त्या जागेचा नकाशा आवश्यक

11) तदंतर सदर दुकानाचे कायम स्वरुपी व्यवस्थापा मंजूर होणेसाठी खालील अटींची अर्जदार व्यक्ती/संस्था धाय दुकान अन्य व्यक्तीच्या जागेत चालविणार असल्यास त्या

जागेचा घरपत्रक उतारा तसेच संबंधित व्यक्तीचे/घरमालकाचे 100/ रुपयांचे स्टॅम्पपेपरवर संमत्तीपत्र आवश्यक.

12) रास्त भाव धाय दुकान मंजूर झालेनंतर सदर व्यक्ती/संस्थेस खुल्या बाजारातील तांदूळ/गहू विकता येणार नाही.

13) जाहिरानामा महिलांसाठी प्रसिध्द झाला असल्यास फक्त महिला अर्जदारांचाच विचार केला जातो.

रास्त भाव धाय दुकान अर्जदार व्यक्ती/संस्थेस मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे अटी शर्ती असल्या तरी शासा प्रचलित आदेशानुसार त्यामध्ये  बदल करणेत येतो.

रास्त भाव धाय दुका ा परवानाचालक मयत झाल्यास शासा निर्णय दि. 22 डिसेंबर 1997 अवये परवानाचालकाच्या वारसास रास्त भाव धाय दुकान मंजूर करावयाचे झाल्यास त्यासाठी निकष

1) परवानाचालक मयत झाल्यास त्याच्या नावावरील परवाना त्वरीत रद्द करण्यात येतो.

2) परवाना चालक मयत झाल्यास त्याच्या  कायदेशीर वारसास सदरचा परवाना चालवावयाचा असल्यास परवाना चालक मयत झाल्यापासून 30 दिवसाच्या आत सदर परवाना तात्पुरत्या स्वरुपात चालविण्यास  जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे पूर्तता करणे आवश्यक.

अ)मयत दुकानदाराच्या कालावधीत दुकानाचे कामकाजाबाबत गंभीर तक्रारी प्राप्त झालेल्या नसाव्यात

ब) ज्या व्यक्तीच्या नावे परवाना द्यावयाचा झाल्यास त्या वारसाला इतर वारसांची स्पष्ट व लेखी संमत्ती असणे आवश्यक. वारसांमध्ये मतभेद असल्यास अर्ज करणाऱ्या वारस व्यक्तीस परवाना देता येत नाही.

क) ज्या वारसाच्या नांवे परवाना द्यावयाचा आहे, ती व्यक्ती  दुकान चालविणेस सक्षम असावी.तसेच सर्वसाधारण अटींप्रमाणे त्याच्याकडे पुरेशी जागा, भांडवल इत्यादी बाबी असणे आवश्यक.

ड) अर्जदार वारस व्यक्तीने मंजूर होणारे धान्य दुकान स्वतः चालविले पाहिजे.

इ) संबंधित वारसाचा चरितार्थ मंजूर होणाऱ्या रास्त भाव धान्य दुकानावरच अवलंबून असलेबाबत पुरावा.

ई) वारसामध्ये पती  किंवा यथास्थितीत पती तसेच सज्ञान मुलगा, सज्ञान

5) अविवाहित मुलगी,अवलंबित आई किंवा वडील यांचाच फक्त विचार केला जाईल. रास्त भाव धान्य दुकान  वारसास मंजूर करताना वेगळा जाहिरानामा प्रसिध्द करणेत येत नाही.

रास्त भाव धाय दुकान वारसास मंजूर करणेसाठी वरीलप्रमाणे अटी शर्ती असल्या तरी शासनाचे प्रचलित आदेशानुसार त्यामध्ये  बदल करणेत येतो.

# रास्त भाव धान्य दुकान मंजूरीसाठी  विचारात घेण्यात येणारी अग्रक्रमसूची

1) बचत गट  (स्त्रि /  पुरुष )
2) स्त्रियांची ग्राहक सहकारी संस्था.
3) इतर ग्राहक सहकारी संस्था
4) ग्राम पातळीवरील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था
5) अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीमधील व्यक्ती.
6) स्वातंत्र्यसंग्राम सैनिक.
7) माजी सैनिक ( या सैनिक कारवाईत मृत सैनिकांची विधवा पती  त्यांचा मुलगा अगर लग न झालेली मुलगी यांचा समावेश आहे.)
8) अपंग व्यक्ती
9) प्रकल्पग्रस्त व्यक्ती.
10) इतर

वर नमूद केलेल्या अग्रक्रम सूचीमध्ये शासान प्रचलित आदेशानुसार बदल करणेत येईल.